# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः12.07.2024** **वारःशुक्रवार**

1. माजी अग्निवीरांसाठी केंद्रीय सुरक्षा दलांमध्ये दहा टक्के आरक्षण लागू करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
2. संसदेत आणि विधीमंडळात सर्वपक्षियांमध्ये मैत्रीपूर्ण संवाद आवश्यक असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं प्रतिपादन
3. प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांच्यावरच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारकडून समिती स्थापन
4. महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज मतदान आणि
5. भारतीय क्रिकेट संघाच्या श्रीलंका दौऱ्याचं वेळापत्रक जाहीर

**<u>अग्निवीर</u>**

माजी अग्निवीरांसाठी केंद्रीय सुरक्षा दलांच्या भरती प्रक्रियेत दहा टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. यामध्ये सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव पोलिस दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल आणि सशस्त्र सीमा बल या केंद्रीय सुरक्षा दलांचा समावेश आहे. माजी अग्निवीरांना वयोमर्यादेच्या अटीमध्ये देखील सवलत मिळेल, तसंच त्यांच्यासाठी कोणतीही शारीरिक क्षमता चाचणी होणार नाही. या निर्णयाद्वारे गृह मंत्रालयांनं एक मोठं पाऊल उचललं आहे, असं केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या महासंचालक नीना सिंग यांनी काल प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<u>भारत-महासत्ता</u>**

2047 पर्यंत भारत महासत्ता होईल असा अंदाज ब्रिटनमध्ये स्थायिक असलेले प्रसिद्ध अर्थतज्ञ मार्टिन वुल्फ यांनी वर्तवला आहे. एका वृतपत्राच्या लेखात त्यांनी हा अंदाज व्यक्त केला असून 2047 पर्यंत चारपट अधिक लोकसंख्या असलेला भारत अमेरिकेच्या आर्थिक उत्पादनाशी बरोबरी करेल. तसंच 2047पर्यंत भारताचा जीडीपी दरवर्षी 5 टक्क्यांनी वाढलेला असेल तर अमेरिकेचा जीडीपी 2 पूर्णांक 3 टक्क्यांनी वाढेल असं वुल्फ यांनी या लेखात म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान</u>**

आगामी केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत अर्थतज्ज्ञांशी संवाद साधला आणि त्यांची मतं, सूचना जाणून घेतल्या. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यावेळी उपस्थित होत्या. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या 22 तारखेपासून सुरू होणार आहे; आणि 23 तारखेला केंद्रीय अर्थसंकल्प सादर होईल.

**पंतप्रधान**

दरम्यान पंतप्रधानांच्या हस्ते उद्या मुंबईत, गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता प्रकल्पातल्या बोगद्याच्या कामाचं भूमिपूजन होणार आहे. पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणाऱ्या या प्रकल्पा अंतर्गत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून प्रत्येकी साडे चार किलोमीटर अंतराचे बोगदे तयार केले जाणार आहेत.

**उपराष्ट्रपती**

संसदेत आणि विधीमंडळात सर्व पक्षीय नेत्यांमध्ये मैत्रीपूर्ण संवाद आवश्यक आहे, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. महाराष्ट्र राज्य विधीमंडळाच्या सदस्यांना त्यांनी काल मुंबईत विधानसभेच्या सभागृहात संयुक्तरित्या संबोधित केलं. सत्ताधारी आणि विरोधक एकत्र आले तरच जनतेच्या समस्या सोडवू शकतात. त्यामुळे लोकांच्या भल्यासाठी काम करा असं आवाहन त्यांनी केलं. संसद आणि विधीमंडळातल्या सध्याच्या कामकाजाबाबत त्यांनी स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त केली. गदारोळ घालण्याच्या प्रयत्नांना अजिबात प्रोत्साहन देऊ नका, शिस्तीचं पालन करणाऱ्यांना अधिकाधिक संधी द्या असं आवाहन त्यांनी सर्व राजकीय पक्षांना केलं. लोकशाहीच्या तिन्ही स्तंभांनी परस्परांमध्ये संवाद ठेऊन समन्वयानं काम करावं असं आवाहन उपराष्ट्रपतीनी केलं. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यपद्धतीचा दाखला उपस्थितांना दिला. महिला, युवा, हवामान बदल यासह जनतेच्या विविध प्रश्नांना कामकाजात प्राधान्य देण्याचं आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी यावेळी बोलताना केलं. तर भारतीय लोकशाही बळकट करण्याची भूमिका उपराष्ट्रपतींनी नेहमीच घेतली आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर तसंच विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनीही यावेळी आपले विचार मांडले.

**पूजा खेडकर**

भारतीय प्रशासकीय सेवेतील प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांच्यावरील आरोपांची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारनं एक सदस्यीय समिती नेमली आहे. कर्मिक मंत्रालयातील अतिरिक्त सचिवांमार्फत ही चौकशी केली जाणार आहे. पूजा खेडकर या 2023च्या तुकडीच्या सनदी अधिकारी आहेत. त्यांच्यावर गैरवर्तणूक तसंच नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दिलेल्या प्रमाणपत्राबाबत आरोप आहेत; याच संदर्भात ही समिती चौकशी करणार असून आपला अहवाल दोन आठवड्यात सादर करणार आहे. खेडकर यांनी त्यांचं प्रशिक्षण सुरू होण्यापूर्वीच स्वतंत्र कक्ष, वाहन, निवासी सुविधा अशा मागण्या केल्याचं पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी दिलेल्या अहवालात म्हटलं आहे. त्यांच्या या विनंत्या नाकारण्यात आल्या असून, त्यांची पुण्याहून वाशिम इथं बदली करण्यात आली आहे.

**सीबीआय-अटक**

नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी सीबीआयनं राकेश रंजन उर्फ रॉकी नावाच्या व्यक्तीला अटक केली आहे. या प्रकरणाचा तो मुख्य सूत्रधार मानला जात असून त्याला दहा दिवसांच्या सीबीआय कोठडीत ठेवण्यात आलं आहे. या प्रकरणातील आणखी एक फरार असलेला संशयित संजीव मुखिया याच्याशीही रॉकीचा संबंध आहे. नीट पेपरफूटी प्रकरणात आत्तापर्यंत 12 जणांना अटक करण्यात आली आहे.

**निवडणूक**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज मतदान होणार आहे. विधान परिषदेच्या 11 जागांसाठी 12 उमेदवार रिंगणात आहेत; त्यासाठी विधान सभेचे सदस्य मतदान करणार आहेत. आज सकाळी 9 ते दुपारी 4 दरम्यान मतदान होऊन आजच संध्याकाळी मतमोजणी होणार आहे. भाजपाकडून पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे रिंगणात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाणे आणि भावना गवळी, तर काँग्रेसकडून प्रज्ञा सातव ही निवडणूक लढवत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद नार्वेकर या निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर शेकापचे जयंत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पाठिंब्याने ही निवडणूक लढवत आहेत.

**विधानमंडळ**

2025 पर्यंत क्षयमुक्त भारत करण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून 18 वर्षांवरच्या सर्व व्यक्तींना क्षयरोग प्रतिबंधक लस देण्याची मोहीम राज्यात राबवली जाणार असल्याची माहिती महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी काल विधानसभेत दिली. छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरलेली वाघनखं येत्या 19 जुलैपासून साताऱ्यातल्या सरकारी संग्रहालयात ठेवली जातील. यावेळी शिवाजी महाराजांच्या शस्त्रास्त्रांचं प्रदर्शनही भरवलं जाईल, अशी माहिती सुधीर मुनगंटीवार यांनी काल विधानसभेत दिली.

**परराष्ट्रमंत्री-एस. जयशंकर**

म्यानमारमधील सायबर घोटाळ्याशी संबंधित टोळ्यांनी बेकायदेशीरपणे ताब्यात घेतलेल्या भारतीयांची लवकर सुटका करावी अशी मागणी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्यानमारचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री यू थान स्वे यांच्याकडं केली आहे. बिमस्टेकच्या वतीनं आयोजित परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत काल याबाबत चर्चा झाली. बिमस्टेकच्या कालच्या बैठकीत सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यासमवेत डॉ. एस जयशंकर यांनी विविध मुद्यांवर चर्चा केली.

**नेपाळ पंतप्रधान**

नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल प्रचंड यांच्यावरच्या विश्वासदर्शक ठरावावर आज मतदान होणार आहे. 20 महिन्यात पाचव्यांदा ते विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जात आहेत. दरम्यान नेपाळच्या संसदेतील नेपाळी काँग्रेस, नेपाळ कम्युनिस्ट पार्टी आणि जनता समाजवादी पार्टी अशा बहुसंख्य पक्षांनी आपापल्या खासदारांना या विश्वासदर्शक ठरावाच्या विरोधात उभं राहावं यासाठी पक्षादेश जारी केला आहे.

**नाटो**

युक्रेन रशिया संघर्षात चीननं महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचा आरोप नाटोनं केला आहे. सायबर विश्वात सुरू असलेल्या चीनच्या कुरापती तसंच चीनचा आण्विक क्षमतेचा वेगवान विस्तार या चिंता आणि भीती निर्माण करणाऱ्या घटना असून जागतिक सुरक्षेसाठी हे आव्हान असल्याचं नाटोनं म्हटलं आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी आयोजित केलेल्या शिखर परिषदेत चीनचा निषेध करणारं संयुक्त घोषणापत्र जारी करण्यात आलं.

**विम्बल्डन**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत झेक प्रजासत्ताकच्या बार्बोरा क्रेजिकोव्हानं काल कझाकस्तानच्या एलेना रायबकिनाचा 3-6, 6-3, 6-4 असा पराभव करत महिला एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. तत्पूर्वी इटलीच्या जास्मिन पाओलिनीनं क्रोएशियाच्या डोनावेकिकचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तर दुसरीकडे पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत आज गतविजेता कार्लोस अल्काराझ आणि डॅनिल मेदवेदेव यांच्यात सामना होणार आहे.

**क्रिकेट भारत-श्रीलंका**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने भारतीय क्रिकेट संघाच्या श्रीलंका दौऱ्याचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. पल्लिकल आंतरराष्ट्रीय स्टेडिअमवर 26, 27 आणि 29 जुलैला वीस षटकांचे सामने होणार आहेत. त्यानंतर मर्यादित षटकांची तीन सामन्यांची आंतरराष्ट्रीय मालिका कोलंबोच्या आर प्रेमदास आंतरराष्ट्रीय स्टेडिअमवर 1, 4 आणि 7 ऑगस्टला होईल. भारतीय संघ आपले नवनियुक्त प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्यासमवेत 22 जुलैला श्रीलंकेत पोहोचेल. या सामन्यांसाठीच्या संघाची घोषणा अद्याप झालेली नाही.

**आसाम**

आसाममध्ये पुरामुळे आतापर्यंत 84 जणांचा मृत्यू झाला आहे. नागाव जिल्ह्यात पुरस्थिती गंभीर असून सुमारे 20 हजार लोकांना याचा फटका बसला आहे. 184 गावं पाण्याखाली असून हजारो हेक्टेर शेतजमीन जलमय झाली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.